# निवीदा सुचना

जा.क्र.वसंशा/कडधान्य/कोटेशन/मनुष्यबळ/१६५/२०२६ दिनांक ०५.०६.२०२६

प्रति,

______________________________

______________________________

______________________________

______________________________

विषयः कंत्राटी/ठेकेदारी तत्वावर कुशल/अकुशल/ट्रॅक्टर चालक/अस्थायी रोजंदार कामगार पुरविण्यास दरपत्रक मागविणे बाबत.

वरील विषयाच्या अनुषंगाने कडधान्य संशोधन विभाग, डॉ. पंदेकृवि., अकोला या कार्यालयाचे संशोधन प्रक्षेत्रावर कंत्राटी / ठेकेदारी अस्थायी तत्वावर व गरजेनुसार कामकाजाकरीता मनुष्यबळ मागणी करणारे निवीदा दरपत्रक पुरविण्यात यावे.

अंतीम निवीदा सादर करण्याची दिनांक १५.०६.२०२६ राहील

| अ. क्र. | कामाचा तपशिल | संख्या | परिमान | दर प्रति दिन प्रति व्यक्ती चे विवरण (रुपये) | | | | एकूण रोजंदारी प्रति दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सेवा कर(रु) | व्यवसाय कर (रु) | निर्वाह निधी कपात (रु) | प्रत्यक्षत मिळणारे वेतन | |
| १ | कंत्राटी /ठेकेदारी तत्वावर अकुशल रोजंदार मजुरः शेती कामा करीता निंदणे राखणी, काढणी पेरणी इ. | ०१ (पुरुष/स्त्री | प्रति व्यक्ती | | | | | |
| २ | कंत्राटी /ठेकेदारी तत्वावर कुशल कामगार/ रोजंदार मजुरः प्रायोगीक क्षेत्रावरील निरिक्षणे घेणे, संगणकीकरण करणे निरिक्षणांची नोंद संगणकावर घेणे ई, करीता कुशल कामगार /रोजंदार मजुर | ०१ (पुरुष/स्त्री | प्रति व्यक्ती | | | | | |
| ३ | कंत्राटी /ठेकेदारी तत्वावर ट्रॅक्टर चालकः प्रक्षेत्रावर ट्रॅक्टर चलीत मशागतीचे कामे करणे, इत्यादी | ०१ (पुरुष/स्त्री) | प्रति व्यक्ती | | | | | |

**अटी व शर्ती :**

१. सदर कामे ही दैनंदीन स्वरूपाची असतील व शासकीय नियमाप्रमाणे दैनंदिन आठ तासाचे काम राहील.

२. कुठल्याही दिवशी मनुष्यबळाचे कामावर हजर राहणे शक्य होत नसल्यास अशा परिस्थितीत पर्यायी व्यक्तिची व्यवस्था किंवा कामावर हजेरी लावण्याची जबाबदारी कंत्राटदार संस्थेची राहील.

३. सदर कामे ही पुर्णतः बाहयस्त्रोतांकडुन असल्याकारणाने जेष्ठता यादीत कामाची अथवा कागावरच्या दैनंदिन हजेरी पुस्तकात नोंद होणार नाही व तसा कुठलाही न्यायालयीन दावा करता येणार नाही.

४. काम समाधानकारक नसल्यास कोणत्याही पुर्व सुचनेशिवाय मनुष्यबळाला कामावरून काढुन टाकण्याचे संपूर्ण अधिकार निम्नस्वाक्षरी धारक यांचे कडे राहतील.

५. किमान वेतन कायद्याचे पालन करावे.

६. कामावरील मनुष्यबळाचे अपघात विमा, भ.नि.नि. खाते, व्यवसाय कर वा वेळोवेळी शासन निर्णयानुसार देय लाभ उपलब्ध करून देण्याची संपुर्ण जबाबदारी सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदार संस्था/कंपणी/ठेकेदार यांची राहील.

७. **दिवस/रात्रपाळी चौकीदार माजुराकडून राखणी करताना पिकाचे नुकसान झाल्यास संबधित मजुराचा पगारातून वसूल करण्यात येयी**ल.

८. सदर मनुष्यबळ पुरविणारी संस्था चे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. नोंदणीचे प्रमाणपत्र तसेच जीएसटी नोंदणी संदर्भातील दस्तऐवज मासीक देयकासोबतसोबत जोडण्यात यावेत. सदर दर पत्रके दिनांक **१५.०६.२०२६** रोजी दुपारी ५.०० वाजता वरीष्ठ संशोधन शास्त्रज्ञ कडधान्य संशोधन विभाग डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला यांचे कक्षात उघडण्यात येतील.

९. अपूर्ण त्रृटी पूर्ण अथवा संबंधीत दस्तऐवज न जोडलेली दर पत्रके रदद करण्यात येतील.

१०. सदर संस्था/कंपनी/ठेकेदार असमाधानकारक काम करीत असेल तर सदर संस्थेचे कंत्राट कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीकर्त्याकडे असतील.

११. गरजेनुसार दैनंदिन शेतीच्या कामाकरीता अकुशल, **कुशल** मजुर **व** ट्रॅक्टर चालक यांची उपलब्ध करणे हि जबाबदारी कंत्राटदार संस्थेची राहील.

5/6/26

वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ
**कडधान्य संशोधन केंद्र**
**डॉ.पं.दे.कृ.वि अकोला.**